Internal circulation - Training of members of YUKRAND - A camp paael Jan 16, 17 / 1990

युवक क्रांती दल व लोकसंघर्ष समितीतर्फे आयोजित

# कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर, पाईट

१७, १८ जानेवारी १९९०

खेड तालुक्यातील भावांनो आणि बहिणींनो,

गेल्या दोन-तीन वर्षांपासून आपण लोक संघर्ष समितीमार्फत पिण्याचे पाणी, गावठाण व घरे, रोजगार इ. प्रश्न तसेच शेतकरी, शेतमजूर, महिला, आदिवासी, विद्यार्थी, छोटे व्यावसायीक इ. घटकांचे प्रश्न घेऊन तालुक्यात संघटना बांधणीचे काम करत आहोत.

मध्यंतरी लोकसभा निवडणुकांच्या निमित्ताने आपण तालुक्याचे प्रश्न लोकांसमोर मांडले, आणि लोकांचे राजकीय शिक्षण केले. आपल्या तालुक्यात आपल्या चळवळीशी आणि विचारांशी जवळीक असलेले खासदार निवडून आले आहेत. आपले प्रश्न धसाला लावण्यासाठी ते निश्चितपणे सहकार्य करतील. दिल्लीतील सत्ताबदलामुळे देशभर सामान्य कष्टकरी जनतेला अनुकूल वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर मागील कार्याचा आढावा, पुढील कार्यक्रम निश्चित करणे व चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय समजून घेणे यासाठी एक प्रशिक्षण शिबीर आयोजित करत आहोत.

**कार्यक्रम:**

**बुधवार ता. १७/१/९०**

दु. १२ ते २ — राजकीय परिस्थिती व संघटनेची भूमिका — अजित सरदार

दु. २ ते ४ — जातीयवादाचे आव्हान — शांताराम पंदेरे

४ – ४॥ — चहा

४॥ — ६ — ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न — वसुधा सरदार

७ ते ८॥ — सांस्कृतिक कार्यक्रम

८॥ वा. जेवण

**गुरुवार ता. १८/१/९०**

स. ९ ते ११ — भारताची अर्थव्यवस्था — प्रा. प्रमोद बियाणी

स. ११ ते १ — पुढील कार्यक्रम व संघटना बांधणी

१ ते २ — जेवण

दु. २ वा. जाहीर सभा

<u>सूचना</u> — १७ ता. ला सर्वांनी मुक्काम करायचा आहे. त्यादृष्टीने पुरेसे पांघरूण आणावे. तसेच सभासद वर्गणी रु. १०१- बरोबर घेऊन येणे.

जेवण व नाश्ता-चहाची व्यवस्था संघटनेमार्फत केली जाईल.

आपले,

अजित सरदार

आनंदा गोपाळे, सुरेश चित्ते, तुकाराम खुडे, जानकू भोईर, इंदुबाई कदम, लीलाबाई भालेराव, मळूबाई बेंडोरे, सीताराम-चांगदेव पारधी

शांताराम गोपाळे

(निमंत्रक)